**प्रेसनोट दि. २०.०६.२०२३**

लोकसेवक श्री. महादेव विठ्ठल जाधव, ग्रामविकास अधिकारी मणेराजुरी ग्रामपंचायत, ता.तासगाव, जि.सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ७,०००/- रुपये लाच मागणी केल्याने त्यांचे विरुद्ध सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांना जिल्हा परिषद सांगली यांचेकडून घरकुल योजनेचा मंजूर निधीपैकी दुसरा हप्ता मंजुर होणेकरीता पंचायत समिती तासगाव येथे शिफारस पाठविणेसाठी लोकसेवक श्री.महादेव विठ्ठल जाधव, ग्रामविकास अधिकारी मणेराजुरी ग्रामपंचायत, ता.तासगाव, जि.सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रुपये लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.०८.०५.२०२३ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०८.०५.२०२३ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये लोकसेवक श्री. महादेव विठ्ठल जाधव, ग्रामविकास अधिकारी मणेराजुरी ग्रामपंचायत, ता.तासगाव, जि.सांगली यांनी तक्रारदार यांना जिल्हा परिषद सांगली यांचेकडून मंजूर यशवंत-वसंत घरकुल योजनेचा दुसरा हप्ता मंजुर होणेकरीता पंचायत समिती तासगाव येथे शिफारस पाठविणेसाठी स्वतः करीता व साहेबांकरीता १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती ७,०००/- रूपयांची लाचेची मागणी करून, लाच रक्कमेपैकी ५,०००/- रूपये लागलीच घेवून येण्यास सांगून उर्वरित २,०००/- रूपये हे दोन-तीन दिवसांत घेवून येण्यास सांगून लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक लोकसेवक श्री. महादेव विठ्ठल जाधव, ग्रामविकास अधिकारी मणेराजुरी ग्रामपंचायत, ता.तासगाव, जि.सांगली रा. गणेश कॉलनी, तासगाव ता.तासगाव, जि.सांगली यांचेविरुध्द तासगाव पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे, पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्रीमती शितल जानवे, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री संदीप पाटील, श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अजित पाटील, प्रितम चौगुले, रविंद्र धुमाळ, सलीम मकानदार, ऋषीकेश बडणीकर, सुदर्शन पाटील, उमेश जाधव, पोपट पाटील, रामहरी वाघमोडे, चालक अनिस वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in